भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०७/२०१७

**१) अश्लील शब्दात शिवीगाळ करून जबरीने पैसे हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १०/०७/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी गुरूदेव भावुराव येळणे वय ३० वर्ष रा. मोहाडी यांनी महेन्द्रा मॅक्स गाडी थांबवीली असता यातील आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन अश्लील शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीची गच्ची पकडुन मला पैसे दे नाहीतर तुझी गाडी चालु देणार नाही असे बोलुन शर्टचे वरचे खिशातुन ५०/रु चे ३ नोटा व १००/रु च्या ४ नोटा असे एकुण ५५०/रु हीसकावुन घेवुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३९२,२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी उईके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) आजाराला कंटाळुन नायलॉन दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०९/०७/२०१७ चे २१.०० वा.ते २४.०० वा. दर. यातील मृतक नौसागर अभिनव दहिवले वय ५० वर्ष, रा. आकोट याचे डाव्या पायाच्या अंगठयाला जखम असुन तिथे पॉयजन झाल्याने त्या आजाराला कंटाळुन स्वतःचे घरी माजघरात मयालीला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी रामेश्वर देवराम दहिवले वय ५० वर्ष रा. आकोट यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) विहीरीचे पाण्यात युवक मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–**

दिनांक ०९/०७/२०१७ चे २०.०० वा.ते दि.१०/०७/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील मृतक प्रशांत उर्फ बालु उदाराम देशमुख वय ३३ वर्ष, रा. कोसरा याचे कोंडाकोसरा येथे रिलायन्स दुधडेहरी व भारत गॅस एजन्सीचे दुकान असुन ती दुकान नेहमी प्रमाणे सकाळी ०६०० वा उघडुन रात्री ०८०० वा पर्यत बंद करून घरी जात होता मृतक नेहमी प्रमाणे रात्री वेळेवर घरी न आल्याने मृतकचे आईने फिर्यादीस फोन करून सांगितले असता फिर्यादी व नातेवाईक यांनी मृतक याचा शोधाशोध केले असता मृतक हा डॉ.कल्पना चावला कॉलेज जवळील विहीरीचे पाण्यात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी विजय रामदास काटेखाये वय ५० वर्ष रा. कोसरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी ढोबळे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४)उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ७/०७/२०१७ चे २३.५० वा. दर. यातील मृतक अशोक झनकलाल मेश्राम वय ५५ वर्ष रा. अजिद बाबा चौक साकोली हा LRTI या आजाराने सामाण्य रूग्नालय भंडारा येथे औषधोपचार करीता भरती असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. भंडारा यथे डॉ. मेमो वरून मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे पोहवा मडावी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १०/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२४ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.